# पुणे महानगरपालिका

## सन २०१३–१४ च्या कर आकारणीबाबत मिळकतीच्या मालकांस

## जाहीर नोटीस

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या परिशिष्ट ८ मधील नियम क्र. १३ व १५ (१) अन्वये देण्यात येते की, सन २०१३–१४ साठी सर्व वॉर्डातील मिळकतीचे वार्षिक करपात्र मूल्य (Annual Rateable Value) दर्शविणारे 'आकारणी पुस्तक' (Assessment Book) संगणकीय आकारणी नोंदी तयार केले असून, ते पाहण्याकरिता महापालिकेच्या मुख्य इमारतीतील करआकारणी व करसंकलन कार्यालयाच्या करआकारणी विभाग, तळमजला, खोली क्र. ६,१३ व १९ मध्ये ठेवले आहे. ते कार्यालयीन कामाचे दिवशी व वेळेत बघावयास मिळेल. या आकारणी पुस्तकात (Assessment Book) नमूद केलेली वार्षिक करपात्र मूल्य (Annual Rateable Value) वा इतर नोंदणी सन २०१२–१३ प्रमाणेच आहेत अगर कसे? याची मिळकतदारांनी खात्री करून सदर नोंदीसंबंधी तक्रारी असल्यास, त्यांनी दिनांक २०.१२.२०१३ ते १५.०१.२०१४ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ पर्यंत तक्रारी कारणांसह मा. उप आयुक्त तथा, करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११००५ यांच्या नावे लेखी पाठवाव्यात. तसेच दिनांक १५.०१.२०१४ रोजी सायंकाळी ५.४५ नंतर आलेल्या तक्रारी अर्जांचा विचार केला जाणार नाही. प्रत्येक मिळकतीबाबत स्वतंत्र तक्रार अर्ज मिळकतीचे मालकानेच करावयाचा आहे.

चालू वर्षासह कराची बाकी भरल्याखेरीज तक्रार अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच यापूर्वी केलेल्या अर्जाचा निकाल झालेल्या मिळकतदाराने पुन्हा पूर्वीच्याच कारणावरून अगर तत्सम मुद्द्यावर अर्ज केल्यास ते अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

वार्षिक करपात्र मूल्याबाबत (Annual Rateable Value) स्मॉल कॉज कोर्टात मनपाविरूध्द अपिल केले आहे, अशा निकाल झालेल्या मिळकतदारांनी या जाहीर नोटिशीस अनुसरून तक्रार अर्ज करण्याचे कारण नाही.

पुणे – ४११ ००५
दिनांक :–१०.१२.२०१३

(हेमंत निकम)
उप आयुक्त तथा
करआकारणी व करसंकलन प्रमुख
पुणे महानगरपालिका

---

टीप –१) वरील जाहीर नोटिशीस अनुसरून केलेल्या अर्जाची महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये व संबंधित सर्व कार्यालयांमध्ये दिल्याबद्दल लेखी पोहोच पावती घेणे जरूरीचे आहे. पाठविलेला अर्ज़ महापालिकेकडे विहित कालावधीत न पोहोचल्यास त्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

२) आकारणी पुस्तकातील नोंदीव्यतिरिक्त इतर अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३) अर्जदारांनी संबंधित तक्रार अर्ज पोस्टाने किंवा रजिस्टर ए.डी. व्दारे वर नमूद केल्याप्रमाणे मुदतीतच पाठवायचे आहेत. मुदतबाहय अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

४) अर्जदाराने संगणकीय मिळकत कराचे छायांकित बिल साक्षांकित करून तक्रार अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५) उपरोक्त कालावधीत नागरिकांना त्यांच्या मिळकत कराविषयक माहिती www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.